www.learningwithsmartness.in

# शिष्यवृत्ती सराव पेपर चौथी

## विषय - भाषा   गुण 50 गुण

खालील उतारा काळजीपूर्वक वाचून प्रश्नांची उत्तरे द्या.

आपण सर्वांनी पक्ष्यांना आकाशात उडताना पाहिले आहे. त्यांचे शरीर हलके व पिसांनी आच्छादित असते. उडण्यासाठी त्यांना मजबूत पंख असतात. फुलपाखरे, मधमाशा आणि गांधीलमाशा देखील उडू शकतात. पण त्यांचे पंख लहान असतात. आपण आकाशात रंगीबेरंगी पतंग उडताना बघतो. पतंग पातळ कागदापासून तयार केलेला असतो. लांब धाग्याने पतंग उडवता येतो. विमान जड असूनही आकाशात उंच उडते. प्रशिक्षित वैमानिक विमान उडवतात.

प्र.1) यातील कोण स्वतःहून उडू शकत नाही?

1. फुलपाखरू   2) गांधीलमाशी   3) पतंग   4) मधमाशी

प्र.2) पक्ष्यांचे शरीर कशाने आच्छादित असते?

1. हवा   2) पिसे   3) कागद   4) धागे

प्र.3) विमान कोण उडवतो?

1. मजबूत पंख   2) लांब पंख   3) लहान पंख   4) प्रशिक्षित वैमानिक


प्र.4) पतंग तयार करण्यासाठी कशा प्रकारचा कागद वापरतात?

1. पातळ   2) जाड   3) जड   4) मजबूत

प्र.5) पतंगाचा धागा कसा असतो?

1. लहान   2) लांब   3) उंच   4) जड

खालील जाहिरात पाहून प्रश्नांची उत्तरे द्या.




प्र.6) जाहिरात कशाची आहे?

1. नाटक   2) चित्रपट   3) सर्कस   4) यापैकी नाही

प्र.7) बालनाट्याचे नाव काय आहे?

1. यापैकी नाही 2) चौकस चिंगी घोरणारा मासा 3) चल रे भोपळ्या टुणुक टुणुक 4) पोहणारा मासा

प्र.8) बालनाट्य कोणत्या दिवशी आहे?

1. यापैकी नाही 2) शनिवार दिनांक 22 एप्रिल 3) शुक्रवार दिनांक 21 एप्रिल 4) रविवार दिनांक 23 एप्रिल

प्र.9) या नाटकाचे दिग्दर्शन कोणी केले आहे?

1. रजनी चिपलकट्टी 2) योगेश डिखले 3) लता वानखेडे 4) —

प्र.10) नाटक कोणासाठी आहे?

1. लहान मुलांसाठी 2) मोठ्या माणसासाठी 3) स्त्रियांसाठी 4) यापैकी नाही

प्र.11) खालीलपैकी जोडाक्षर असणारा शब्द कोणता?

1. ससोबा 2) मित्र 3) पाऊस 4) टपटप

प्र.12) खालीलपैकी जोडाक्षर नसणारा शब्द कोणता?

1. चमचमणाऱ्या 2) ससुल्याला 3) आणायला 4) इतक्यात

प्र.13) वेगळा शब्द ओळखा.

1. शशी 2) प्रभाकर 3) सूर्य 4) भास्कर

प्र.14) गटात न बसणारा शब्द ओळखा.

1.पाणी 2) मेघ 3) जल 4) उदक

प्र.15) गटात न बसणारा शब्द ओळखा.

1. धरती 2) चपला 3) विद्युत 4) वीज

प्र.16) गटात न बसणारा शब्द ओळखा.

1.जमीन 2) वीज 3) धरती 4) धरणी

प्र.17) मेंढीच्या पिल्लाला काय म्हणतात?

1. कोकरू 2) रेडकू 3) करडू 4) वासरू

प्र.18) त्याग करणे म्हणजे काय?

1. पळवून लावणे 2) मिळवणे 3) संघर्ष करणे 4) सोडून देणे

प्र.19) राष्ट्रध्वजात सर्वात वर कोणता रंग असतो?

1. हिरवा 2) केसरी 3) पांढरा 4)जांभळा

प्र.20) गटात न बसणारी जोडी ओळखा.

1. राष्ट्र–देश 2) वंदन–नमन 3) ध्वज–झेंडा 4) सुख–दुःख

प्र.21) एकवचनी पर्याय निवडा.

1. पिले 2) जळवा 3) मळा 4) लांडगे

प्र.22) खालीलपैकी भूतकाळी क्रियापद कोणते?

1. खाईल 2) खातो 3) खाल्ले 4) खा

प्र.23) रिकाम्या जागी योग्य अक्षर घालून अर्थपूर्ण शब्द बनवा.

| | | |
|---|---|---|
| पं | | त |
| स | | त |
| अं | | ण |

1. व.  2) ग.  3) ल.  4) न

प्र.24) स्त्री शिक्षणाचा पाया कोणी घातला?

2. महात्मा गांधी  2) महात्मा फुले  3) लोकमान्य टिळक  4) रवींद्रनाथ टागोर

प्र.25) मराठी भाषेचे लेखन कोणत्या लिपीत केले जाते?

1. संस्कृत  2) मोडी  3) देवनागरी  4) नागरी

Visit https://learningwithsmartness.in/

NAVNTAH MOHAN LAD